Trade-wings LIMITED
A-2 Kaveri CHS, Plot No.63
Sector 17, Vashi
Navi Mumbai - 400 705. INDIA
Phone : +91 (022) 68835801
Email : companysecy@twltravel.com
Website : www.tradewings.in

**Date: 13th August,2025**

To,
**BSE Limited,**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai- 400001.

**Dear Sir/ Madam,**

**Ref: Trade Wings Limited (Scrip Code: 509953)**

**SUB: Submission Of Newspaper Copies of Publication of Unaudited Quarterly Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Quarter Ended June 30, 2025.**

In terms of Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company has published Extract of Statement of Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Quarter ended on June 30, 2025, which have been considered, approved and taken on record by the Board of Directors, at their meeting held on Monday, 11th August, 2025.

The said financial results have been published in 'Times of India' (English Newspaper) Goa edition dated 13.08.2025 & in 'Pudhari' (Marathi newspaper) Goa edition dated 13.08.2025.

Further, in pursuance of Regulation 30 read with Part A of Schedule III enclosed herewith please find below the copy of Newspaper articles as published in abovementioned newspapers.

Kindly take the above on record and oblige.

Thanking you,

**For and on behalf of**
**TRADE WINGS LIMITED**

Pinto

TRADE-WINGS LIMITED

**Zurica Kevin Pinto**
**Company Secretary and Compliance Officer** **Place: Mumbai**
**Membership Number: A27623**

**Encl: As above**

# ऑफ दि रेकॉर्ड

## ■ ...म्हणूनच गर्दी झाली नसावी

कर्नाटकातील मतदार याद्यांत घोळ झाल्याचा दावा करून दिल्लीत आंदोलन करणारे काँग्रेसचे खासदार राहुल गांधी व इतर काँग्रेस नेत्यांना सोमवारी पोलिसांनी अटक केल्याचा निषेध करण्यासाठी मंगळवारी गोवा प्रदेश काँग्रेसने पणजीत आंदोलन केले. मात्र, त्या आंदोलनाला फारच अल्प प्रतिसाद मिळाला. गेली अनेक वर्षे केंद्रात आणि राज्यात सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसने पक्षाचा विस्तार करण्यावर भर न दिल्याचा हा परिणाम असावा. दुसरीकडे, राहुल गांधी कर्नाटकात मते वाढल्याचा दावा करून आंदोलन करतात. मात्र, तेथे काँग्रेसचेच सरकार आहे.

## ■ अधिवेशन झाले, मंत्रिमंडळ विस्तार केव्हा?

उद्याला शेवट नसतो, असे सांगितले जाते. जी गोष्ट वारंवार उद्यावर ढकलली जाते; ती केव्हाच अस्तित्वात येत नाही, असे म्हटले जाते. तसाच प्रकार गोवा सरकारच्या मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत झाला आहे. गेली दीड ते दोन वर्षे मंत्रिमंडळ फेरबदल होणार म्हणून चर्चा केली जाते. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत किंवा प्रदेशाध्यक्ष दामोदर नाईक हे वारंवार मंत्रिमंडळ फेरबदल काही दिवसांतच होईल, असे सांगतात. पावसाळी अधिवेशनापूर्वी तर अधिवेशनानंतर लगेच मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे सांगितले जात होते. मात्र, अधिवेशन संपले आणि काही दिवस गेले तरी मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत काहीच हालचाली दिसून येत नाहीत. त्यामुळे मंत्रिपदासाठी बाशिंग बांधून बसलेल्या भाजपच्या आमदारांमध्ये निराशा पसरली आहे.

## ■ कुत्र्यांची सर्वोच्च दखल

सर्वोच्च न्यायालयाचा एक निवाडा आला



असून दिल्ली एनसीआरमध्ये रहिवासी क्षेत्रातील कुत्र्यांना आठ आठवड्यांत हलवून त्यांना निवारागृहात हलवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अलीकडे गोव्यातही श्वानदंशाच्या अनेक घटना घडत आहेत. सरकारने हिंस्र कुत्र्यांवर बंदी आणणारे विधेयकही विधानसभेत संमत केले आहे. आता दिल्लीच्या धर्तीवर भटक्या कुत्र्यांवर कारवाई करून सरकार लोकांना दिलासा देईल का, हे पाहावे लागेल.

## ■ बेछूट बोलण्यासाठी अपक्षच बरे

ॲड. प्रतिमा कुतिन्हो या महिला काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या. त्यावेळी त्या महिलांना मोठ्या प्रमाणात आंदोलनासाठी जमा करत. त्यानंतर त्या आम आदमी पक्षात दाखल झाल्या आणि नावेलीतून निवडणूकही लढवली. मात्र, २०२२ च्या निवडणुकीत त्या पराभूत झाल्या. त्यानंतर त्यांनी सोडचिठ्ठी दिली आणि स्वतंत्रपणे विविध विषयांवर त्या आवाज उठवत असतात. राजकीय पक्षात काम करताना पक्षाच्या नेत्यांचे ऐकावे लागते. त्या नेत्यांनी बोलायची संधी दिली, तरच बोलायची संधी मिळते; त्यापेक्षा कुठल्याही पक्षात न राहता अपक्ष राहिल्यास मनाला वाटेल तेव्हा बोलता येते, याची जाणीव कुतिन्हो यांना झालीय. सध्या त्या अपक्ष असल्या तरी निवडणूक जवळ येताच कुठल्या तरी पक्षाचा आधार घेऊ शकतात.

## ■ खासगी प्रॅक्टीसविरोधात कायदा

सरकारी सेवेत असताना खासगी प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी कायदा केला जाईल, असे वक्तव्य आरोग्यमंत्र्यांनी केले आहे. काही डॉक्टरांविरोधातील त्यांची नाराजी कायम आहे. वार्षिक १२ लाख किंवा त्यापेक्षा अधिक पगार असणाऱ्यांना खासगी प्रॅक्टीसला अटकाव करण्यासाठी हा कायदा असेल, असे ते म्हणाले आहेत. अर्थात त्याला कोणाची काही हरकत असण्याचे कारण नाही.

# भाऊसाहेबांनी केले गोवा पुनर्निर्माणाचे कार्य

## मगोचे अध्यक्ष दीपक ढवळीकर : फर्मागुढीत पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

- भाऊसाहेबांनी गोव्यात शिक्षणाचा विकास केला : ढवळीकर
- समाज एकत्र करण्याचे कार्य : ढवळीकर



फर्मागुढी : भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमात उपस्थित दीपक ढवळीकर. शेजारी इतर मान्यवर.

**फोंडा : पुढारी वृत्तसेवा**

पोर्तुगिजांनी नष्ट केलेला गोवा पुनर्निर्माणाचे कार्य गोव्याचे पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांनी केले म्हणून समृद्ध गोवा साकारत आहे, असे उद्‌गार मगो पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री दीपक ढवळीकर यांनी काढले.

फर्मागुढी-फोंड्यात भाऊसाहेब बांदोडकर पुण्यतिथीनिमित्त आज मंगळवारी पुष्पांजली अर्पण केल्यानंतर दीपक ढवळीकर बोलत होते.

यावेळी युवा नेते मिथिल ढवळीकर, जिल्हा पंचायत सदस्य प्रिया च्यारी, दामोदर नाईक, गणपत नाईक, सरपंच रामचंद्र नाईक, सर्वेश जल्मी, विशांत नाईक इतर पंचसदस्य तसेच मगोप्रेमी नागरिक उपस्थित होते.

ढवळीकर म्हणाले, भाऊसाहेब म्हणजे गोमंतकीयांसाठी प्रेरणास्रोत आहे. गोव्यात शिक्षणाची गंगा भाऊसाहेबांनी आणली. मगो पक्षाच्या माध्यमातून सर्व समाजाला एकत्र आणण्यास भाऊसाहेबांनी प्रयत्न केले तेच कार्य अव्याहतपणे सुरू असून गोवाभर विखुरलेले मगोप्रेमी हीच गोव्याची खरी शक्ती असल्याचे ढवळीकर म्हणाले.

भाऊसाहेब बांदोडकर यांनी गोव्याला समृद्ध करताना औद्योगिक शैक्षणिक वैद्यकीय आणि इतर क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे दीपक ढवळीकर यांनी सांगून आदरांजली अर्पण केली.

### भाऊसाहेबांमुळे प्रेरणा!

भाऊसाहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे युवा वर्गाला प्रेरणा मिळत आहे. शिक्षणाचा विकास म्हणजे मानवी जीवनाचा विकास आहे, हे जाणून भाऊसाहेबांनी गावागावात सुरू केलेल्या शाळांमुळे आज गोमंतकीय साक्षर होण्यास मदत झाली. भाऊसाहेबांचे हे कार्य युवा वर्गाला मार्गदर्शक ठरले आहे. त्यामुळेच गोवा राज्य शंभर टक्के साक्षर बनले आहे. हे फक्त भाऊसाहेबांमुळे शक्य झाले आहे, असे ढवळीकर म्हणाले.

# भाऊसाहेब युवा वर्गाचे प्रेरणास्थान : रितेश नाईक

**फोंडा : पुढारी वृत्तसेवा**

भाऊसाहेब हे लोकप्रिय नेते होते. समाजासाठी जे हितकारक निर्णय आहेत ते त्यांनी घेतले. म्हणूनच गोवा प्रगतीपथावर येऊ शकला. भाऊसाहेब म्हणजे युवावर्गासाठी प्रेरणास्थान आहेत, असे उद्‌गार फोंडा शिक्षण संस्थेचे सचिव त्या नगरसेवक रितेश नाईक यांनी काढले.

यावेळी फोंडा नगराध्यक्ष आनंद नाईक, नगरसेवक रूपक देसाई व इतर मान्यवर उपस्थित होते. भाऊसाहेबांच्या पुतळ्याला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर ते बोलत होते. भाऊसाहेबांनी गावागावांत शाळा सुरू केल्या. त्यामुळे गोव्यात १०० टक्के साक्षरता झाली आहे. नगराध्यक्ष आनंद नाईक यांनीही भाऊसाहेबांच्या स्मृतीला उजाळा देताना गोव्याचा एक महान पुरुष असा उल्लेख केला.



फर्मागुडी : अभिवादन करताना रितेश नाईक.

# भाऊसाहेबांनी गोव्याला दिली योग्य दिशा!

**फोंडा : पुढारी वृत्तसेवा**

भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुण्यातिथीदिनी प्रियोळ मतदारसंघाचे आमदार गोविंद गावडे तसेच सावर्डे मतदारसंघाचे आमदार डॉ. गणेश गावकर यांनी त्यांना पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. आमदार गोविंद गावडे म्हणाले की, भाऊसाहेब बांदोडकर यांनी गोव्याला योग्य दिशा दिली त्यामुळे गोवा राज्य प्रगतिपथावर जाऊ शकले. आमदार गणेश गावकर म्हणाले की, भाऊसाहेबांच्या दूरदृष्टीमुळे गोव्याचा विकास झाला. त्यांचे स्मरण कायम राहील, असे सांगून त्यांनी भाऊसाहेबांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली.



फर्मागुढी : अभिवादन करताना आमदार गणेश गावकर.

Reg.AD.

IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-VI, SALCETE, MARGAO - GOA

CASE No.JM-VI/TNC/Pur/Nuvem/5/2025

1.Mr.Francis Xavier Luis H.no. 84,Grande Vanelim, Colva Salcete Goa Pincode, 403708 2.Mr. Ptricio Coutinho R/o Chinchinim Salcete, South Goa, Pin code 403715 .......Applicants

V/S

1.Mrs. Agustina Costa 2.Mr. Andre Costa Both r/o H.no. 8, Old Market Near Holy Spirit Church (Largo De Igreja Old Market) Margao South Goa Pin Code 403601 3. Govt. Of India Through Deputy Collector(Revenue) South Goa Pin Code 403601 ........Respondents

PUBLIC NOTICE

To,
The Respondent No.1 & 2,

WHEREAS, the above mentioned Applicants have filed an application dated 19/06/2025 under Section 18-C of Goa Daman and Diu Agricultural Tenancy Act 1964.

And Whereas, Notices were sent to the above respondents by registered A/D but Notices have been unserved as per tracking report issued by the Postal authority .

And Whereas, the Applicant vide application dated 07/08/2025 has prayed for substitute service by publishing the notice in the daily local newspaper under V.Rule.20(1-A) of C.P.C 1908 as the respondents whereabouts is not known.

And whereas, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

Therefore, notice is hereby given to the above mentioned Respondents to appear before this Court in person or by duly authorized agent on **09/09/2025 at 10.30am.** to give your say on the above mentioned date and time.

It may be noted that in default of your appearance the application will be heard and decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this the 11th day of August 2025.

Sd/- Seal
(Siddhy Pai Angle)
Joint Mamlatdar-VI Salcete

CHANGE OF NAME

I, **MASHUDA BI**, resident of H. NO. 15/A, Muslim Wada, Sanguem, South - Goa 403704 has changed my name from **MASHUDA BI MUSTAK** to **MASHUDA BI**. Here After In All My Dealings And Documents, I Will Be Known By The Name **MASHUDA BI**.

CHANGE OF NAME

I, **MUSHTAQ ABDUL LATIF SHAIKH**, resident of H. NO. 15/A, Muslim Wada, Sanguem, South - Goa 403704 has changed my name from **MUSTAK LATIF SHAIKH**, to **MUSHTAQ ABDUL LATIF SHAIKH**. Here After in All My Dealings And Documents, I Will Be Known By The Name **MUSHTAQ ABDUL LATIF SHAIKH**.

# 'हे' भाऊसाहेबांमुळेच शक्य

## आमदार मायकल लोबो यांच्याकडून आदरांजली

**म्हापसा : पुढारी वृत्तसेवा**

संपूर्ण देशात गोवा हे एकमेव असे राज्य आहे; जेथे भाटकाराच्या जागेत घर बांधून राहाणारा त्या घरचा कायद्याने मालक होतो. राहातो त्याचे घर आणि कसेल त्याची जमीन हे केवळ भाऊसाहेब बांदोडकर यांच्यामुळेच शक्य होऊ शकले, असे उद्‌गार कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांनी काढले. गोव्याचे भाग्यविधाते प्रथम मुख्यमंत्री स्व. भाऊसाहेब उर्फ दयानंद बांदोडकर यांच्या ५२ व्या पुण्यतिथीनिमित्त कळंगुट समुद्रकिनाऱ्याजवळील बांदोडकर यांच्या पुतळ्याजवळ आयोजित कार्यक्रमात आमदार ते बोलत होते.

यावेळी कळंगुटचे सरपंच जोसेफ सिक्वेरा, पंचायत मंडळाचे सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

स्वातंत्र्यानंतर राज्याचा भरपूर विकास झालेला आहे; परंतु सुरक्षित पर्यटनाच्या बाबतीत आपण दिवसेंदिवस मागे पडत असल्याचे सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी सांगितले. सूत्रसंचालन व आभार एकनाथ नागवेकर यांनी केले.



कळंगुट : भाऊसाहेब बांदोडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना आमदार मायकल लोबो. सोबत एकनाथ नागवेकर.

# गोवा मराठी अकादमीच्या पर्वरी प्रभागाचे उद्या उद्घाटन

**पर्वरी :** गोवा मराठी अकादमीतर्फे पर्वरी येथे 'अभिजात' हा प्रभाग सुरू करण्यात येत आहे. पर्वरी येथील विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाच्या बोर्डरूममध्ये गोवा मराठीच्या 'अभिजात' पर्वरी प्रभागाचे उद्या बुधवार दि. १३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ४ वा. उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार तथा साहित्यिक संजय ढवळीकर तर विशेष उपस्थिती म्हणून गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर नाट्यवाचन, कविसंमेलन, कथा वाचन असे विविधांगी कार्यक्रम होणार आहेत. यावेळी पर्वरी विभागाची नवीन कार्यकारिणी जाहीर केली जाईल. या कार्यक्रमास परिसरातील सर्व मराठीप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन पर्वरी मराठी प्रभाग तसेच जनशिक्षण संस्थानचे श्रीहरी आठल्ये यांनी केले आहे.

# गोवा-लंडन बंद विमानसेवा सुरू करा!

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**



सदानंद शेट तानावडे

गोवा-लंडन या मार्गावरील बंद एअर इंडियाची विमान सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे यांनी केली.

शून्य तासाच्या सत्रात महत्त्वाचा मुद्दा तानावडे यांनी उपस्थित केला. गोव्याच्या मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळ, मोप आणि लंडन गॅटविक विमानतळ या दरम्यान एअर इंडियाची थेट विमान सेवा बंद आहे. त्यामुळे लंडनला जाणाऱ्या गोवेकरांना असुविधा होत आहे. त्यामुळे ही विमानसेवा पुन्हा सुरू व्हावी. एका महिन्यापेक्षा जास्त काळापासून सुरू असलेल्या या निलंबनामुळे गोव्यातील नागरिकांना गैरसोय आणि त्रास सहन करावा लागत आहे, असेही तानावडे यांनी नमूद केले.

गोवा सरकार
**विद्युत खाते,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**नागरी वि. XV (एन) पणजी-गोवा**
**आयडीसी इमारत, ६ वा मजला, पाटो-प्लाझा, पणजी-गोवा**

**निविदा सूचना**
(फक्त ई-निविदा प्रणालीने)

निविदा सुचना क्र. १३ (२५-२६) जारी केली आहे आणि इच्छुक कंपन्यांच्या सहभागासाठी https://eprocure.goa.gov.in या संकेतस्थळावर प्रदर्शीत केली आहे.

**डीआय/जाहीरात/ १०३८/२०२५**

**गोवा वेस्ट मॅनेजमेंट कॉर्पोरेशन**
(गोवा सरकारचा उपक्रम)

पत्ता: सालीगाव पठार, सालीगाव - बार्देश, गोवा-४०३५११ ईमेल: gwmc.goa@gov.in

संदर्भ: आरएफक्यू क्र.०१/२०२५-२६ दिनांक: ११.०८.२०२५

**ई-निविदा सूचना**

गोवा वेस्ट मॅनेजमेंट कॉर्पोरेशन (GWMC) कडून डिझाइन, अभियांत्रिकी, आर्थिक व्यवस्था, बांधकाम, पुरवठा, स्थापना, कार्यान्वयन, कार्यक्षमता चालविणे तसेच पंधरा (१५) वर्षे काळासाठी १०० टन प्रति दिवस क्षमतेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्राची पुनर्वापर व वर्गीकरण ओळीवर, विभागणी, जैव-मीथनेशन व कंपोस्टिंग प्रणालीवर आधारित संचलन व देखभाल या बाबींसाठी पात्रता अनुरोध (Request For Qualification) मागविण्यात येत आहे. सदर ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख २६/०९/२०२५ रोजी सायं. १६:३० वाजेपर्यंत आहे.

तपशीलांसाठी संकेतस्थळ https://eprocure.goa gov in भेट द्या

**डीआय/जाहीरात/ १०३४/२०२५**





आगोंद : ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण करताना सभापती रमेश तवडकर. बाजूला मान्यवर.

# पर्यटन वाढीसाठी पायाभूत सुविधा उभारणार : तवडकर

## आगोंद येथे ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण

**खोतीगाव: पुढारी वृत्तसेवा**

मतदारसंघातील प्रत्येक गावातील वीज पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी प्रयत्न केले. पर्यटनवाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे हे माझे ध्येय आहे, असे प्रतिपादन सभापती डॉ. रमेश तवडकर यांनी केले.

रजनी पाईक देवस्थानच्या सभागृहात ३४ कोटी रुपयांच्या खर्चातून पूर्ण झालेल्या वीज प्रकल्पाचे लोकार्पण व धवलखाजण, देसाईवाडा तसेच रुग्णालयाजवळ उभारण्यात आलेल्या नवीन ट्रान्सफॉर्मर केंद्रांचा प्रारंभ करण्यात आला.

यावेळी मुख्य वीज अभियंता स्टिफन फर्नांडिस, सहाय्यक अभियंता गोविंद भट, भाजप मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, सरपंच नीलेश पागी, उपसरपंच करूणा फळदेसाई, पंच फातिमा रॉड्रिग्ज, रामनाथ वेळीप, केनिशा फर्नांडिस, जॉन फर्नांडिस उपस्थित होते. सरपंच पागी यांनी आगोंद पंचायत क्षेत्रातील कामांचा सविस्तर अहवाल सादर केला. मान्यवरांच्या हस्ते फलकाचे अनावरण करून प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

सूत्रसंचालन संतोष लोलयेकर, प्रास्ताविक नीलेश पागी, तर फातिमा रॉड्रिग्ज यांनी आभार मानले.

**ट्रेड-विंग्ज लिमिटेड**

**सीआयएन :** L63040GA1949PLC000168
**नोंदणीकृत कार्यालय पत्ता : १ला मजला, नाईक बिल्डिंग, डॉन बॉस्को हायस्कूल समोर, महात्मा गांधी रोड, पणजी, गोवा -४०३ ००१**
**टेलिफोन -०२२-४२३०९४५५, ई-मेल :** companysecy@twltravel.com, **वेबसाईट-** www.tradewings.in

३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाही वर्षासाठी वार्षीक अलेखापरिक्षीत स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड आर्थिक रिझल्ट्सचा अंश

(रूपये लाखात दर शेअर मूल्य वगळता)

| (अलेखापरिक्षीत) | स्टँण्ड अलोन | | | | कन्सोलेटेड | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाही अखेर | | | वर्ष अखेर | तिमाही अखेर | | | वर्ष अखेर |
| | ३०.०६.२०२५ (अलेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) | ३०.०६.२०२४ (अलेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) | ३०.०६.२०२५ (अलेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) | ३०.०६.२०२४ (अलेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) |
| कामकाजातून एकूण उत्पन्न | ६०५५.६६ | ५२२६.०० | ५९०५.८१ | २१२४४.४५ | ६७५९.५९ | ६३४८.७२ | ६५८५.८३ | २४९३९.६२ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | -०.५७ | १२२.८८ | -४०.०८ | ६०.८० | १५.७८ | ३२०.३८ | -१०८.०८ | ३६१.५२ |
| करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | -०.५७ | १२२.८८ | -४०.०८ | ६०.८० | १५.७८ | ३२०.३८ | -१०८.०८ | ३६१.५२ |
| करानंतर कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | -०.५७ | ११९.२९ | -४०.०८ | ५७.२१ | १५.७८ | ३३९.२० | -१०८.०८ | ३८०.३४ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न कालावधीसाठी नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश | -०.५७ | १११.१३ | -४०.०८ | ४९.०५ | १५.७८ | ३३६.५३ | -१०८.०८ | ३७७.६७ |
| इक्विटी शेअर भांडवल (प्रति शेअर रु. १०/- दर्शनी मूल्य असलेले इक्विटी शेअर) | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० |
| राखीव निधी (मागील वर्षाच्या अंकेक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | ०.०० | ०.०० | ०.०० | -१५७.१६ | ०.०० | ०.०० | ०.०० | -१४२६.७७ |
| प्रति शेअर मिळकत (असाधारण बाबींपूर्वी) (प्रत्येकी रु. १०/- चे) (सुरू असलेल्या व्यवसायासाठी) | | | | | | | | |
| बेसिक | -०.०२ | ३.९८ | -१.३४ | १.९१ | ०.५३ | ११.३१ | -३.६० | १२.६८ |
| डायल्युटेड | -०.०२ | ३.९८ | -१.३४ | १.९१ | ०.५३ | ११.३१ | -३.६० | १२.६८ |
| प्रति शेअर मिळकत (असाधारण बाबींनंतर) (प्रत्येकी रु. १०/- चे) (बंद केलेल्या व्यवसायासाठी) | | | | | | | | |
| बेसिक | -०.०२ | ३.९८ | -१.३४ | १.९१ | ०.५३ | ११.३१ | -३.६० | १२.६८ |
| डायल्युटेड | -०.०२ | ३.९८ | -१.३४ | १.९१ | ०.५३ | ११.३१ | -३.६० | १२.६८ |

**नोट :**

१) वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या **३० जून, २०२५** रोजी संपलेल्या तिमाहीच्या वार्षिक एकल आणि एकत्रित आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. वार्षिक एकल आणि एकत्रित आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.tradewings.in वर उपलब्ध आहे.

२) वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या **११ ऑगस्ट, २०२५** रोजी झालेल्या संबंधित सभेत ते नोंदवून घेतले आहेत. चालू तिमाही आणि आर्थिक वर्षाचे निकाल कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे अंकेक्षित केले आहेत.

३) आर्थिक निकालांमध्ये, कंपनीची पूर्ण मालकीची उपकंपनी - ट्रेड विंग्स हॉटेल्स लि. मधील गुंतवणुकीच्या मूल्यामध्ये झालेल्या ऱ्हासासाठी (impairment) कोणतीही तरतूद केलेली नाही, कारण व्यवस्थापनाला 'चालू उद्योग' तत्त्वावर उपकंपनीच्या निकालांमध्ये सकारात्मक प्रगतीची अपेक्षा आहे.

४) **३१ मार्च, २०२५** रोजी संपलेल्या वर्षाचे आकडे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे अंकेक्षित केले आहेत. वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल निर्वेध (unqualified) आहे. **३१ मार्च, २०२५** रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे संपूर्ण आर्थिक वर्षाचे अंकेक्षित आकडे आणि संबंधित आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतच्या प्रकाशित अ-अंकेक्षित आकड्यांमधील ताळमेळ साधणारे आकडे आहेत, जे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन होते.

५) हे आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत निर्धारित भारतीय लेखा मानके (Ind-S) आणि त्याअंतर्गत वेळोवेळी सुधारित केलेल्या संबंधित नियमांनुसार तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ नुसार तयार केले आहेत. Ind-S १०८, ऑपरेटिंग सेगमेंट्स नुसार, विभागवार माहिती कंपनीच्या अंकेक्षित एकल आणि एकत्रित आर्थिक निकालांमध्ये प्रदान केली आहे.

६) मागील कालावधीचे आकडे, आवश्यकतेनुसार, चालू कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत करण्यासाठी पुनर्गटित / पुनर्वर्गीकृत केले आहेत.

ट्रेड-विंग्ज लि. साठी
स्वाक्षरी/-
**डॉ. शैलेंद्र पी. मित्तल,**
डीआयएन :००२२१६६१
चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : ११ ऑगस्ट २०२५

